MHLA050028042025

दिवाणी कि.अर्ज क्रं.५४/२०२५
देवीदास वि.शासन

<u>नि.क्रं. ०१ खाली आदेश</u>

मौजे तळेगाव येथील गट क्रं.६८/५ पैकी ९० आर क्षेत्र शासनाने पाझर तलावासाठी संपादीत केले. त्याच्या मंजूर मावेजात वाढ व्हावी म्हणून याकामी भूसंपादन प्र.क्रं.४४०/२००१ दाखल होऊन त्यात अर्जदारास वाढीव नुकसानभरपाई मंजूर झाली. त्याची रक्कम रु.४०९२१२/ याकामी जमा आहे. ती मिळावी म्हणून अर्ज केला आहे.

२. जाबदार याने याकामी आपले म्हणणे दिले आणि याकामी अपील प्रस्ताव दाखल आहे. त्यामुळे योग्य तो आदेश होण्याची विनंती केली.

३. सहा.अधिक्षकांनी दिलेल्या अहवालानूसार सदर रक्कम ठेव पावती क्रं.९१५१६७८ अन्वये दि.०९/०५/२०२५ रोजी मुदतठेवीमध्ये ठेवली आहे. या प्रकरणी कोणतेही अपील दाखल नाही असा अहवाल अधिक्षकांनी दिला आहे.

४. याकामी अपील प्रस्ताव दाखल केला असला तरी अपीलाची प्रत सादर केलेली नाही. सदरची रक्कम न्यायालयात ठेवण्यात कोणतेही कारण नाही. अपील दाखल नसल्याने अर्जदाराची योग्य ओळख पटवून सदर रक्कम मुदतठेव मोडून त्यावरील होणा-या व्याजासह अर्जदारास अदा करावी.

स्वाक्षरीत/

दि.१९/०६/२०२६ (एस.एन.सरडे )

दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.